INDIAN THINKER
ISSN 2320 - 6128
Half yearly Research Journal
Vol I Issue IV, Aug. 2014 To Jan. 2015

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार

**डॉ. गो.रा. परडे**
अर्थशास्त्र विभाग,
शरदचंद्र महाविद्यालय नायगांव (बा.)

19

Research Paper - Economics

**प्रास्ताविक :-**

जगभर खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण (खाऊजा) धोरण राबवले जात आहे. भारतात हा प्रयोगाचे रौप्य महोत्सवी वर्ष जवळ येत आहे. अशा परिस्थितीत भारतीय अर्थव्यवस्था आर्थिक मंदीचा एकीकडे सामना करीत असतांना दुसरीकडे अत्यावश्यक वस्तुच्या किंमती प्रचंड वेगाने वाढत आहोत. इलेक्ट्रॉनिक्स व संगणकाच्या वाढत्या वापरामुळे बेकारीची समस्या गंभीर बनत चालली आहे. दारिद्र्य आणि निरक्षतेने ३५ ते ४० टक्के जनतेला घेरलेले आहे. श्रीमंत आणि गरीबीची दरी वाढत आहे. मूठभर लोकांकडे भौतिक सुविधांचा महापूर असून काही लोकांचे आयुष्य दुष्काळाने व्यापले आहे. ते पशूवत जिवन जगत आहेत. एका बाजूला अन्नधान्य साठवण्याची समस्या असून दुसज्या बाजुला भूकबळी व कुपोषणाचे प्रमाण वाढत आहे. आदिवासी व इतर उपेक्षित समाजासाठी योजना आखल्या जात आहेत. परंतु परिस्थितीत अपेक्षित बदल होताना दिसत नाही.

मानवी विकासाच्या बाबतीत जन्मदर, दर हजारी मृत्यूदर, बाल मृत्यू, बाळांतपणात महिलांचा मृत्यू, कुपोषण, आरोग्याच्या अपुऱ्या सोयी, सरासरी आयुष्यमानात होणारी संथ वाढ इत्यादी बाबतीत इतर देशाशी तुलना केल्यास आपण अजून खूप मोठा टप्पा गाठावयाचा असल्याचे आढळून येते. या पार्श्वभूमीवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचारच देशाच्या अर्थव्यवस्थेला दिशा देऊ शकतात. म्हणून त्यांच्या जयंती निमित्त त्यांचे आर्थिक विचार समजून घेणे आवश्यक असून त्यांच्या आर्थिक विचारांच्या ठळक बाबींवर या लेखामध्ये विचार करण्यात आला आहे.

INDIAN THINKER ISSN 2320 - 6128
Half yearly Research Journal Vol I Issue IV, Aug. 2014 To Jan. 2015

बाबासाहेब अमेरिकेत एम.ए. व पीएच.डी., इंग्लडमध्ये डि.एस्सी. या अर्थशास्त्रातील उच्च पदव्या प्राप्त करण्यासाठी भारतीय अर्थव्यवस्थे संबंधी मुलभूत संशोधन केले. शोषणमुक्त समाजरचना भारतात निर्माण व्हावी यासाठी स्वतंत्र, समता व बंधुभाव या तीन तत्वांचा अंगिकार केला. ही तत्वे समाजव्याप्त व्हावीत यासाठी जीवन वेचले. समाज जागृती हा मानवी विकासाचा आधार आहे असे समजून भारतीय समाजाच्या सामाजिक, धार्मिक, राजकिय, सांस्कृतिक, आर्थिक पैलूंचा चिकित्सक अभ्यास करून समाजाच्या सर्वांगीण विकासाची रूपरेषा निश्चित केली व त्या आधारे योग्य दिशने समाजाचा निरंतर विकास होत रहावा यासाठी मोठाल्या जनसंघटना त्यांनी उभारली.

बाबासाहेबांच्या आर्थिक विचारांचा आढावा घेताना त्यांचा दोन भागात विचार करावा लागेल.

१) शैक्षणिक किंवा उच्च पदव्या मिळवण्यासाठी केलेले अर्थशास्त्रीय विश्लेषण.

२) समग्र समाज परिवर्तनासाठी जीवनाचा सर्वांगीण विचार करणारे लिखाण.

डॉ. बाबासाहेबांनी एम.ए. पदवी संपादन करण्यासाठी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात प्राचीन भारतीय वाणिज्य या विषयावर शोध प्रबंध लिहिला होता. तर पीएच.डी. या पदवीसाठी भारताचे राष्ट्रीय उत्पन्न एक ऐतिहासिक व विश्लेषणात्मक अध्ययन हा शोध प्रबंध पूर्ण केला तर एम.एस्सी. या उच्च पदवीसाठी ब्रिटीश भारतातील राजेशाही वित्ताचे प्रादेशिक विकेंद्रीकरण हा शोध प्रबंध लिहिला.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक तत्वज्ञानावरील लेखन,**

१) ईस्ट इंडिया कंपनी, प्रशासन आणि कार्यनिती.

२) ब्रिटीश भारतातील प्रांतिक विश्वाची उत्क्रांती.

३) रूपयाचा प्रश्न

४) खोती पध्दत व महार वतन विरोधी चळवळ

५) स्वतंत्र मजूर पक्ष स्थापना

६) कामगार चळवळ, बहिष्कृत भारत, जनता साप्ताहिक

७) संविधानात केलेल्या आर्थिक तरतूदी

८) राज्य समाजवादाचा आग्रह.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे फक्त तात्वीक विश्लेषक करणारे वसिध्दांत मांडणारे नव्हते तर ते कृतीवादी थोर अर्थशास्त्रज्ञ होते.

INDIAN THINKER ISSN 2320 - 6128
Half yearly Research Journal Vol I Issue IV, Aug. 2014 To Jan. 2015

**शेती संबंधीचे विचार :-**

१९१८ मध्ये त्यांनी भारतातील शेत जमीनीचे लहान लहान तुकडे व त्यावरील उपाय हा प्रबंध लिहिला आणि त्यात शेतीचे मुख्य चार प्रश्न मांडले.

१) शेतीत काय पिकवावे

२) शेतीसाठी लागणाऱ्या साधनांचे उत्पादन कसे करावे.

३) शेतीच्या गटाचे क्षेत्र किती असावे.

४) शेत जमीन धारणाचे प्रभावी कोणते असावे.

शेतीचे तुकडीकरण रोखून किफायतशीर केली पाहिजे. आर्थिक कसोटी हे शेती क्षेत्रातील उत्पादनाची असली पाहिजे तरच शेती क्षेत्राला धारण क्षेत्र म्हणता येईल. शेतकऱ्यांकडे असणारे अपूरे भांडवल, अपूरी कमी प्रतीची साधने या कारणांमुळे शेती किफायतीशर तसेच शेतमजूराकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे.

**रूपयाचा प्रश्न :-**

रूपयाचा प्रश्न हा प्रबंध विद्यापीठास सादर केल्यानंतर वाद निर्माण झाला होता. कारण यात त्यांनी भारतीय चलनाच्या इतिहासाच्या घडामोडी ब्रिटीश सरकारचे वाभाडे काढले होते. म्हणून ते म्हणाले होते की, पदवी दिली नाही तरी चालेल परंतु प्रबंधात फेरबदल करणार नाही.

रुपयाचा प्रश्न म्हणजे रूपयाची किंमत स्थिर करण्याचा प्रश्न. कारण रूपयाची किंमत स्थिर तर वस्तुची किंमत स्थिर राहील व महागाई वाढणार नाही असे त्यांनी विश्लेषण केले होते. स्वातंत्र्य मिळून ६५ वर्षे झाली तरी अजूनही रूपयाचे मूल्य स्थिर करण्यात सरकारला यश आलेले दिसत नाही. रूपयाची किंमत का कोसळते याचे शास्त्रीय कारण म्हणजे दुसऱ्या वस्तु विकत घेण्यासाठी रुपयाची ताकत कमी होते. परंतु खरे कारण वस्तुच्या किंमतीतील हालचालीत आहे असे त्यांचे मत होते. पण ते मानावयास सरकार तयार नव्हते. चलनाची किंमत स्थिर ठेवण्यासाठी चलन फुगवट्यावर नियंत्रण ठेवले पाहिजे असा विचार डॉ. आंबेडकरांनी मांडला होता.

**आर्थिक विचारांचे सामाजिक संदर्भ :-**

भारतीय समाज व्यवस्था परंपरने विषमतेवर आधारित आहे. श्रम विभागाची संकल्पना वैश्विक असली तरी श्रम विभागाची परिमाने वेगवेगळी आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेत श्रम विभागाची जाती व्यवस्था व अस्पृश्यतेवर आधारित आहे. ही विभागनी श्रमाची नसून श्रमिकांची

INDIAN THINKER
ISSN 2320 - 6128
Half yearly Research Journal
Vol I Issue IV, Aug. 2014 To Jan. 2015

आहे. बुध्दीमत्ता किंवा कौशल्यावर नव्हती, यात वैयक्तीक भाव भावना, आवडी, निवडींना स्थान नाही तर पूर्वाजन्मीचे कर्मफळ या सिध्दांतावर आधारलेले आहे. आर्थिक संघटन या दृष्टीनेही जाती व्यवस्था ही अतिशय हानीकारक आहे. ती माणसांच्या अंगभूत गुणास व सामाजिक भावनेस दडपण असते. त्यामुळे उत्पादन क्रिया अकार्यक्षम होऊन आर्थिक प्रगतीला खिळ बसते. जाती व्यवस्थेमध्ये व्यवसाय बदलण्याचा अधिकार नसल्याने व्यवसायात समन्वय नसतो. त्यातूनच बेकारीचे प्रमाण वाढते असे त्यांनी दाखवून दिले आहे. डॉ. आबेडकर असा दावा करतात की अस्पृश्य आर्थिक दास्यातून जोपर्यंत मुक्त होत नाहीत तोवर त्यांना कोणतेही भवितव्य नाही. कामगारांविषयी बाबासाहेब आंबेडकर म्हणतात संपाचा हक्क म्हणजे कामगारांच्या स्वातंत्र्याचा हक्क होय. त्यांनी कामगारांच्या हिताकडे विशेष लक्ष दिले होते.

दिवसें दिवस वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे दारिद्र्याचा प्रश्न गंभर होत चालला आहे. याची जाणीव बाबासाहेबांना झाली होती. म्हणून दारिद्र्य निर्मुलनावरील प्रतिबांधक उपाय म्हणजे संतती नियमन होय हे ओळखून त्यांनी आमदार जनार्धन रोहम यांच्या करवी १९३८ मध्ये मुंबई असेंब्लीत संतती नियमनाची मांडणी केली होती. हे विधेयक मांडणारे ते पहिले राजकिय पुढारी होत. तेंव्हा या विधेयकास ज्यांनी विरोध केला त्यांनीच नंतर त्याचा पुरस्कार केला हे विशेष आहे.

शेवटी बाबासाहेबांचे अर्थशास्त्र शोषितांचे अर्थशास्त्र असून त्याला शास्त्रीय निश्चित क्षेत्र तर्कशास्त्र आणि वस्तुनिष्ठतेची जोड आहे. जाती व्यवस्था आणि अस्पृश्यता यासारख्या सामाजिक समस्यांचे आर्थिक दृष्टीकोनातून विश्लेषक करणारे बहुदा पहिलेच विचारवंत म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर असावेत. त्यांनी मांडलेले आर्थिक विचार आजही लागू पडत आहेत. परंतु भारतीय अर्थव्यवस्थेत त्यांच्या विचारांकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते असे खेदाने म्हणावे लागते.

## संदर्भ सूची

१) डॉ. नरेद्र जाधव (१९९२), डॉ. आंबेडकर : आर्थिक विचार आणि तत्वज्ञान, सुगावा प्रकाशन, पुणे.

२) किर धनंजय (१९९९), डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई.

३) स्मरणीका (२००२), मराठवाडा अर्थशास्त्र अधिवेशन शंकरनगर, नांदेड.